## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**
१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक २८/०६/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतचे कागदपत्रे.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४१/२०१२/जा.४४०, दिनांक २९/०६/२०१२.
३) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४१/२०१२/जा.४४१, दिनांक २९/०६/२०१२.
४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, टिळकनगर पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २४/०७/२०१२ रोजी प्राप्त लेखी अभिवेदन.
५) ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ चे मालक तथा प्राधिकृत वाहतूक ठेकेदार तथा बी.आर. ट्रान्सपोर्टचे मालक सुरेंद्र सुभेदार सिंह, अ.शि.वा. दुकान क्र.३३/ई/५६ या दुकानाचे भागीदार रामलाल रामभरत रस्तोगी व तनुश्री महिला स्वंयसहाय्यता बचत गटाचे गटप्रमुख यांचे यांचे दिनांक २४/०७/२०१२ रोजी सादर केलेले स्वतंत्र लेखी निवेदने.
६) अ.शि.वा. दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानाचे मुळ प्राधिकारपत्रधारक नरेशकुमार अग्रवाल यांचे दिनांक २५/०७/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४१/२०१२/जा. ७९२
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.
दिनांक :- ०८/१०/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

### आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २१/०६/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयाच्या फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी हे पंचांसह संध्याकाळी ०८:१५ वाजता पी.एल. लोखंडे मार्गावरील दिपक किराणा स्टोअर्स, सावित्रीबाई चाळ, चेंबूर या ठिकाणी पोहचले. त्या ठिकाणी एक लाल रंगाचा ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ उभा असलेला आढळला. सदर ट्रक हा शासनाचे अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६ या

दुकानास खेटून असल्याचे व त्यातून एक इसम ट्रकमधून गोणी उतरवून दुकानात टाकत असल्याचे आढळून आले. अधिकारी व पंच वरील बाबतची चौकशी व पाहणी करताना तेथे दोन व्यक्ती उपस्थित होत्या व त्या व्यक्तींनी तुमचे काय सुरु आहे ? अशी विचारणा पंचांसमक्ष केली असता, अधिकाऱ्यांनी त्यांची ओळख देऊन त्यांचे नांव विचारले असता, त्यांनी त्यांची नांवे गुलाब छोटेलाल यादव व संतोष रामभरत रस्तोगी अशी असल्याचे सांगून यादव हे ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ चे चालक असल्याचे व संतोष रस्तोगी हे अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानात नोकर म्हणून काम करीत असल्याचे सांगितले.

तद्नंतर ट्रकचे चालक गुलाब छोटेलाल यादव यांना ट्रकमध्ये काय आहे, याची विचारणा केली असता, सदर ट्रकमध्ये शालेय पोषण आहार योजनेचा तांदूळ असल्याचे अधिकारी व पंचांसमक्ष त्याने सांगितले. त्यानंतर ट्रक चालक यादव यांना ट्रकमधील किती बाचकी तांदूळ उतरविला याबाबत विचारले असता, १ गोणी तांदूळ शिधावाटप दुकानात उतरविल्याचे सांगितले. तसेच सदरचा तांदूळ कोठून आणला, याबाबतची विचारणा केली असता, त्यांनी सदर तांदूळ एफ.सी.आय. गोदाम बोरीवली येथून उचलल्याचे तसेच सदरचा तांदूळ शालेय पोषण आहार योजना (एम.डी.एम.) योजनेचा असल्याचे अधिकारी व पंचांसमक्ष सांगितले.

ट्रक चालक यादव यास सदरचा शालेय पोषण आहार योजनेचा तांदूळ एफ.सी.आय. गोदामातून केव्हा व किती गोणी भरणा केला. याबाबत विचारले असता, त्यांनी सदरचा शालेय पोषण आहाराचा तांदूळ सकाळी गेटपास क्र. १३९३८५, वितरण आदेश क्र. १५३०२, दिनांक १३/०६/२०१२ अन्वये २१० बाचकी महाराष्ट्र स्टेट को. ऑप. कन्झ्यु. फेडरेशन लि. यांच्या वतीने सकाळी १०:१५ ते ०२:०० वाजण्याच्या सुमारास भरणा करुन दुपारी ०२:०० वजण्याच्या सुमारास गेट बाहेर पडले व ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ वितरणाकरिता घेऊन निघालो, असे पंचांसमक्ष सांगितले. ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ मधील तांदूळ कोठे कोठे उतरवून दिला याबाबत ट्रक चालक याचेकडे चौकशी केली असता, ट्रकमधील १० बाचकी विक्रोळी येथील भवानी महिला मंडळ यांना तसेच पी.एल. लोखंडे मार्ग येथील चेंबूर मधील अनिल नावाच्या व्यक्तीला ३२ बाचकी वितरण केल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सागितले. वितरण केलेल्या मालाच्या बिलांबाबत विचारणा केली असता, सदर बिले वाहतूक ठेकेदार सुरेंद्र सुभेदार सिंह याचे मॅनेजर हनुमंत पवार यांच्याकडे असल्याचे सांगितले. तसेच त्यांचे आदेशानुसार तांदळाचे वितरण केले, असे पंचांसमक्ष सांगितले.

अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानात उपस्थित असलेले संतोष रामभरत रस्तोगी याचेकडे विचारणा केली असता, ट्रक चालकाने १ बाचका तांदूळ उतरविल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. तसेच

दुकानात उपस्थित संतोष रस्तोगी यांना आपण दुकानात काय म्हणून काम करता, याबाबत विचारणा केली असता त्याने दुकानात नोकर असल्याचे सांगितले. अधिकृत शिधावाटप दुकानात उपस्थित व्यक्ती रस्तोगी यांना १ गोणी तांदळाची ट्रक चालकाला किती रक्कम अदा केली, याबाबत विचारणा केली असता, १ गोणी तांदळाची रुपये ६००/- (अक्षरी रुपये सहाशे फक्त) इतकी रक्कम अदा केली, असे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. तद्नंतर दुकानात उपस्थित रस्तोगी याच्याकडे दुकानाचे प्राधिकारपत्रधारक व मालक कोण आहेत, याबाबत विचारणा केली असता, त्याने प्राधिकापत्रधारक बाहेर गेल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. तसेच घेतलेले १ गोणी तांदूळ कोणासाठी खरेदी केला याची विचारणा केली असता, त्याने स्वतःच्या घरी वापरासाठी तांदूळ खरेदी केल्याचे पंचांसमक्ष सांगितले.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानाचे प्राधिकारपत्रधारक यांना बोलावून घेण्याचे उपस्थित दुकानाचे प्रतिनिधी संतोष रस्तोगी यांना सांगितले असता, त्याने पंचांसमक्ष दुकानाचे प्राधिकारपत्रधारक यांना दुरध्वनी करुन दुकानात बोलाविले असल्याचे सांगितले. त्यानंतर रात्रौ ०९:०० वाजण्याच्या सुमारास दुकानाचे भागीदार रामलाल रस्तोगी हे दुकानात हजर झाले व अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष दुकानाची परिशिष्ट-अ नुसार संपूर्ण तपासणी घेतली असता, सदर दुकानाच्या तपासणीमध्ये तांदळाचे १ गोणी अधिक असल्याचे आढळले.

तद्नंतर ट्रकमधील बाचक्यांची अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष मोजदाद केली असता, सदर ट्रकमध्ये सुमारे ५० किलो वजनाची १६४ बाचकी (तांदळाची) आढळून आली. आढळून आलेल्या ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ मधील १६४ बाचकी तांदूळ अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सिलबंद केला.

अशाप्रकारे महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि. यांनी शालेय पोषण आहार अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी मधल्या सुट्टीत द्यावयाच्या खिचडीसाठी सदर तांदूळ विविध शाळा/महिला संस्थांना पोहोच करणे आवश्यक असताना, पुरवठादार मे. महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई, वाहतूक ठेकेदार, सुरेंद्र सुभेदार सिंह, वाहनचालक गुलाब छोटेलाल यादव, शिधावाटप दुकानाचे प्रतिनिधी संतोष रामभरत रस्तोगी तसेच पाहिजे आरोपी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६ चे प्राधिकारपत्रधारक नरेशकुमार अग्रवाल व भागीदार रामलाल रस्तोगी यांनी संगणमत करुन शालेय पोषण आहार योजने अंतर्गत शाळा/महिला संस्थांना वितरीत होणारा तांदूळ अवैध मार्गाने प्राप्त करुन अनधिकृतरित्या बेकायदेशीर खरेदी व विक्री करुन गरजू विद्यार्थी व महिला यांना वंचित ठेवल्याने, त्यांनी पी.डी.एस. (कंट्रोल) ऑर्डर, २००१ चा भंग केल्याने तसेच जनतेची व पर्यायाने शासनाची

फसवणूक केलेली असल्याचे सिध्द होत असल्याने संबंधिताविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व ९, २) दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स रेशनिंग (सेकंड) ऑर्डर १९६६ चे कलम ३, ३ (अ), ४, ५ व ६ तसेच ३) बॉम्बे रेशनिंग एरिया शेड्युल्ड, कमोडीटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ३ व ४ चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द टिळकनगर पोलिस ठाणे, मुंबई येथे स्था.ख.क्र. ५५६/२०१२ दिनांक २२/०६/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | शालेय पोषण आहार तांदूळ (५० किलो वजनाच्या १६४ बाचकी) | ८२०० किलो | १,६४,०००/- |
| २ | ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ | १ नग | ८,००,०००/- |
| | | एकूण | ९,६४,०००/- |

प्रस्तूत प्रकरणी, केंद्र शासनाकडून तसेच पर्यायाने राज्य शासनाकडून संपूर्ण अनुदानित असलेला तांदळाचा शासन अनुदानित साठ्याची वाहतूक ठेकेदार व इतर संबंधीतांची उचल करुन शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत नेमणूक करण्यात आलेल्या विविध सेवाभावी संस्थांना पुरवठा करण्याची जबाबदारी आहे. सदर पुरवठा प्रक्रियेमध्ये वाहतूक ठेकेदारांनी संबंधित संस्थांना तांदळाच्या साठ्याची पुरवठा केल्यानंतर प्रचलित पध्दतीनुसार संस्थेची पोहच घेणे आवश्यक आहे. तथापी, याप्रकरणी वाहनचालक गुलाब छोटेलाल यादव याने घटनास्थळी दिलेल्या जबाबात सदर साठ्यापैकी १० बाचके विक्रोळी येथे भवानी महिला मंडळ व ३२ बाचके चेंबूर येथील अनिल नामे इसमास वितरीत केल्याचे सांगून त्याबाबत वाहनचालकाकडे पोहच नसल्याचे सांगितले आहे. उर्वरित साठ्यापैकी तांदळाचा १ बाचका अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानात उतरविला असताना पथकाने रंगेहात पकडले आहे. यावरुन वरील नमूद ४२ बाचक्यांचे वितरण झाले किंवा कसे ? तसेच घटनास्थळी ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ मधील उर्वरित १६४ बाचक्यांचे नेमूण दिलेल्या संस्थेस होणाऱ्या वितरणाबाबतही साशंकता आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २४/०७/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

CONTROLLER OF RATIONING & DIR... HEAD OFFICE MUMBAI

दिनांक २४/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उप निरिक्षक श्री. सचिन लक्ष्मण पाटील हे उपस्थित राहिले व त्यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, टिळकनगर पोलिस ठाणे, मुंबई यांचे वाचावे क्र. ४ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ चे मालक तथा प्राधिकृत वाहतूक ठेकेदार तथा बी.आर. ट्रान्सपोर्टचे मालक सुरेंद्र सुभेदार सिंह, अ.शि.वा. दुकान क्र.३३/ई/५६ या दुकानाचे भागीदार रामलाल रामभरत रस्तोगी व चेंबूर मधील तनुश्री महिला स्वंयसहाय्यता बचत गटाचे गट प्रमुख साईली सुनिल निकाले यांचे वतीने मॅनेजर अनिल नाथा निरभवने हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ५ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले. सदर सुनावणीस ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ चे चालक गुलाब छोटेलाल यादव हे उपस्थित राहिले व त्यांनी गुन्हा कबूल केल्याचे सांगून लेखी निवेदन सादर करण्यास नकार दिला. तसेच अ.शि.वा. दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानातील नोकर संतोष रामभरत रस्तोगी, वाहतुकदार सुरेंद्र सुभेदार सिंह यांचे मॅनेजर हनुमंत पवार हे उपस्थित राहिले व त्यांनी लेखी निवेदन सादर केले नाही. तसेच सदर सुनावणीस भवानी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्यादितचे अध्यक्षा सौ. वृषाली जनार्दन मिठबावकर यांनी उपस्थित राहून त्यांनी [illegible]ा मिळाला असल्याचे मौखिक सांगितले. सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी हे उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

दिनांक २४/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उप निरिक्षक श्री. सचिन लक्ष्मण पाटील यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, सदर गुन्ह्यामध्ये घटनास्थळी ताब्यात घेण्यात आलेल्या मो/ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ याच्या मालकाकडे सदर गुन्ह्याबाबत सखोल चौकशी केली असता, त्यांनी त्यांचे सर्व काम हे त्यांच्याकडे हणमंत पवार हे पाहत असल्याचे सांगून त्यांनी कधीही कोणत्याही चालकास अशाप्रकारे परस्पर कोणताही माल विकण्याविषयी सांगितले नसल्याचे सांगितले आहे. तसेच पकडले जाण्यापूर्वी चालकांनी वाटप केलेल्या मालाच्या वैधतेबाबत खात्री करणेकामी भवानी महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था तसेच भवानी महिला मंडळ गोवंडी यांचे नमूद प्रतिनिधींना पोलिस ठाणेस बोलावून चालकाने उतरविलेल्या मालाबाबतची खात्री करण्यात आली आहे. तरी सदर गुन्हा व जप्त मुद्देमाल हा

जीवनावश्यक वस्तूंशी संबंधीत असल्याने सदर जप्त मुद्देमालाबाबत योग्य ते पुढील आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक २४/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अ.शि.वा. दुकान क्र.३३/ई/५६ या दुकानाचे भागीदार रामलाल रामभरत रस्तोगी यांनी युक्तीवाद केला की, दिनांक २१/०६/२०१२ रोजी तो त्याच्या वैयक्तिक कामाच्या निमित्ताने शिधावाटप दुकान बंद करण्याच्या वेळेस अर्थात ०८:०० वाजता त्याच्या दुकानात नोकरास बंद करण्याचे सांगून दुकान सोडून निघाला. त्यानंतर त्याच्या नोकराने पंचनाम्यात त्याने केलेल्या बाबीचा त्याला व त्याचे मुळ प्राधिकारपत्रधारक श्री. नरेशकुमार अग्रवाल यांना जराही कल्पना न देता केलेला आहे. त्याच्या नोकराने केलेल्या सर्व बाबीबाबत त्याला दुरध्वनी सांगितल्यानंतर सदर बाबत त्याला त्वरीत दुकानात बोलवित असल्याचे सांगितले. त्यानुसार रात्रौ सुमारे ०९:०० वाजता दुकानात हजर झालो व उपस्थित अधिकाऱ्यांनी त्याला झालेल्या माहितीबाबत माहिती देऊन दुकानाची संपूर्ण तपासणी घेतली. तपासणीत नोकराने अनधिकृतपणे घेतलेले १ गोणी अर्थात ५० किलो तांदूळ अधिक असल्याचे आढळले. झालेल्या सर्व प्रकरणाचे जर आपण रुपातंर करुन पाहिले तर आपल्या निदर्शनास येईल की दुकानात उपस्थित नोकराने दुकानाच्या मुळ व भागीदार प्राधिकारपत्रधारक यांना नकळत सर्व गैरव्यवहार केला आहे. तरी आपण न्याय दृष्टीकोनातून त्याच्या नोकराने केलेल्या चुकीचा दंड त्याला व त्याच्या दुकानास देऊ नये, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २४/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ चे मालक तथा प्राधिकृत वाहतूक ठेकेदार तथा बी.आर. ट्रान्सपोर्टचे मालक सुरेंद्र सुभेदार सिंह यांनी युक्तीवाद केला की, दिनांक २१/०६/२०१२ रोजी ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ बोरीवली (एफ.सी.आय.) गोदाम येथून शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत २१० बाचका तांदूळ वजन ९९-२५-३५० कि.ग्रॅ. भरुन संबंधित महिला संस्था यांना वितरीत करण्यासाठी निघाला होता. त्यामध्ये भवानी महिला मंडळ विक्रोळी, अक्षदा महिला मंडळ आणि महिला मंडळ गोवंडी यांना महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्झ्यु. फेडरेशन लि. च्या डिलव्हरी चलान नुसार खाली केला होता. परंतू त्याच्या नंतर अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३ ई ५६ मध्ये ट्रक चालक गुलाब यादव याच्या द्वारे एक गोणी (५० कि.ग्रॅ.) विकण्यात आली. त्याच्या बद्दल ट्रान्सपोर्टरला कोणतीही माहिती नव्हती अथवा ट्रान्सपोर्टरचा कोणताही प्रतिनिधी त्यामध्ये सहभागी नव्हता. तरी उपरोक्त विषयाबाबत गंभीरता पूर्वक विचार करुन उचित कार्यवाही करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २४/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित चेंबूर मधील तनुश्री महिला स्वयंसहाय्यता बचत गटाचे गट प्रमुख साईली सुनिल निकाले यांचे वतीने मॅनेजर अनिल नाथा निरभवने यांनी सादर केलेल्या गट प्रमुख यांच्या निवेदनात, दिनांक २१/०६/२०१२ रोजी गाडी क्र. एमएच-४३-ई-६९५३ महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटीव्ह कन्झुमर फेडरेशने लिमीटेड च्या डिलीवरी चलनानुसार १४६९ कि.ग्रॅ. तांदूळ त्यांच्या तनुश्री महिला स्वयंसहाय्यता बचत गट, रुम नं. १, चाळ क्र. १, इंदिरा नगर, प्रभाग क्र. २, लिंबूनी बाग, गोवंडी, मुंबई ४०० ०४३ या पत्त्यावरील किचनमध्ये खाली करण्यात आला. उरलेला इतर माल कुठे खाली केला ते माहिती नसून वरील माल त्यांचे विश्वासू श्री. अनिल नाथा निरभवने यांच्या उपस्थित खाली करण्यात आला, असे नमूद केले आहे.

अ.शि.वा. दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानाचे मुळ प्राधिकारपत्रधारक नरेशकुमार अग्रवाल यांचे दिनांक २५/०७/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, तो ३३ ई ५६ या दुकानाचा मुळ प्राधिकारपत्रधारक असून दिनांक २१/०६/२०१२ रोजी आपल्या कार्यालयातील फिरते पथकातील अधिकाऱ्यांनी त्याच्या दुकानावर पंचनाम्यासह जी कारवाई केली त्याचा दुरध्वनीवरुन त्याचे भागीदार श्री. रामलाल रस्तोगी यांनी त्याला माहिती दिली आहे. घडलेल्या प्रकाराच्या दिवशी त्याची शारिरीक परिस्थित चांगली नसल्यामुळे तो मुंबईत हजर नव्हता. तो त्याच्या मुळ गावी राजस्थान सिकर येथे उपचाराकरीता गेलेला असल्यामुळे त्याला सदर प्रकरणी त्यादिवशी उपस्थित रहाता आले नाही. त्याच्या गैरहजेरीमध्ये झालेला सर्व कारभार त्याच्या भागीदाराच्या माहितीनुसार त्यांनी नेमलेल्या नोकर म्हणजे इसम श्री. संतोष रस्तोगी यांनी केलेला आहे. त्या गैर व्यवहाराबद्दल त्याला व त्याच्या भागीदारास कोणतीही कल्पना नसून त्याबाबत दयेचा दृष्टीकोन ठेवून त्याच्या दुकानावर व त्याच्यावर कमीत कमी दंड आकारुन किंवा कमीत कमी शिक्षा द्यावी, असे विनंती केलेली आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २१/०६/२०१२ रोजी या कार्यालयाच्या फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी हे पंचांसह पी.एल. लोखंडे मार्गावरील दिपक किराणा स्टोअर्स असे नाव असलेले अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६, सावित्रीबाई चाळ, चेंबूर या ठिकाणी पोहचले असता त्या ठिकाणी एक लाल रंगाचा ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ मधून अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानात एक इसम ट्रकमधून गोणी उतरवून

0008
दुकानात टाकत असल्याचे आढळून आले. अधिकारी व पंच यांनी उपस्थित इसम नामे गुलाब छोटेलाल यादव व संतोष रामभरत रस्तोगी यांचेकडे चौकशी केली असता, यादव हे ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ चे चालक व संतोष रस्तोगी हे अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानात नोकर म्हणून काम करीत असल्याचे सांगितले. तद्नंतर ट्रकचे चालक गुलाब छोटेलाल यादव यांना ट्रकमध्ये काय आहे, याची विचारणा केली असता, सदर ट्रकमध्ये शालेय पोषण आहार योजनेचा तांदूळ असल्याचे अधिकारी व पंचांसमक्ष त्याने सांगितले. त्यानंतर ट्रक चालक यादव यांनी ट्रकमधील १ गोणी तांदूळ शिधावाटप दुकानात उतरविल्याचे कबूल केले. तसेच सदरचा तांदूळ हा त्यांनी एफ.सी.आय. गोदाम बोरीवली येथून उचलल्याचे तसेच सदरचा तांदूळ शालेय पोषण आहार योजना (एम.डी.एम.) योजनेचा असल्याचे अधिकारी व पंचांसमक्ष सांगितले. सदरचा शालेय पोषण आहार योजनेचा तांदूळ एफ.सी.आय. गोदामातून त्यांनी सकाळी गेटपास क्र. १३९३८५, वितरण आदेश क्र. १५३०२, दिनांक १३/०६/२०१२ अन्वये २१० बाचकी महाराष्ट्र स्टेट को. ऑप. कन्झ्यु. फेडरेशन लि. यांच्या वतीने सकाळी १०:१५ ते ०२:०० वाजण्याच्या सुमारास भरणा करुन दुपारी ०२:०० वजण्याच्या सुमारास गेट बाहेर पडून वितरणाकरिता घेऊन निघालो, असे पंचांसमक्ष सांगितले. सदर ट्रकमधील तांदूळच्या साठ्यापैकी १० बाचकी विक्रोळी येथील भवानी महिला मंडळ यांना तसेच पी.एल. लोखंडे मार्ग येथील चेंबूर मधील अनिल नावाच्या व्यक्तीला ३२ बाचकी वितरण केल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सागितले. वितरण केलेल्या मालाच्या बिलांबाबत विचारणा केली असता सदर बिले वाहतूक ठेकेदार सुरेंद्र सुभेदार सिंह याचे मॅनेजर हनुमंत पवार यांच्याकडे असल्याचे सांगितले. तसेच त्यांचे आदेशानुसार तांदळाचे वितरण केले, असे पंचांसमक्ष सांगितले. अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानात उपस्थित असलेले संतोष रामभरत रस्तोगी याचेकडे विचारणा केली असता, ट्रक चालकाने १ बाचकी तांदूळ उतरविल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष कबूल करुन, १ गोणी तांदळाची रुपये ६००/- (अक्षरी रुपये सहाशे फक्त) इतकी रक्कम ट्रक चालकास अदा केली, असे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष दुकानाची परिशिष्ट-अ नुसार संपूर्ण तपासणी घेतली असता, सदर दुकानाच्या तपासणीमध्ये तांदळाचे १ गोणी अधिक असल्याचे आढळले. तद्नंतर ट्रकमधील बाचक्यांची अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष मोजदाद केली असता, सदर ट्रकमध्ये सुमारे ५० किलो वजनांची १६४ बाचकी (तांदळाची) आढळून आली. आढळून आलेल्या ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ मधील १६४ बाचकी तांदूळ अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सिलबंद केला. अशाप्रकारे महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि. यांनी शालेय पोषण आहार अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी मधल्या सुट्टीत द्यावयाच्या खिचडीसाठी सदर तांदूळ विविध शाळा/महिला संस्थांना पोहोच करणे आवश्यक असताना, पुरवठादार

मे. महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई, वाहतूक ठेकेदार, सुरेंद्र सुभेदार सिंह, वाहनचालक गुलाब छोटेलाल यादव, शिधावाटप दुकानाचे प्रतिनिधी संतोष रामभरत रस्तोगी तसेच पाहिजे आरोपी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६ चे प्राधिकारपत्रधारक नरेशकुमार अग्रवाल व भागीदार रामलाल रस्तोगी यांनी संगणमत करुन शालेय पोषण आहार योजने अंतर्गत शाळा/महिला संस्थांना वितरीत होणारा तांदूळ अवैध मार्गाने प्राप्त करुन अनधिकृतरित्या बेकायदेशीर खरेदी व विक्री करुन गरजू विद्यार्थी व महिला यांना वंचित ठेवल्याने, त्यांनी जनतेची व पर्यायाने शासनाची फसवणूक केलेली असल्याचे सिध्द होत असल्याने संबंधिताविरुध्द गुन्हा नोंद करुन रुपये ९,६४,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचे परिपत्रक क्र. शापोआ/सुधायो/प्राशिसं/३०३/२०११-१२/७१७७(अ) दिनांक ०१/११/२०११ नुसार शासन निर्णय क्रमांक शापोआ-२००९/प्र.क्र.१३६/प्राशि-४ दिनांक १८/०६/२००९ अन्वये शहरी भागात तांदुळाची वाहतुक करुन शाळांना किंवा शाळांनी केंद्रीय स्वयपाक गृहाचा अवलंब केला असल्यास त्या ठिकाणापर्यंत तांदुळाचा पुरवठा केला जाणार असल्याचे नमुद आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १८/०६/२००९, दिनांक ०२/०२/२०११ नुसार शिक्षण संचालनालया मार्फत सन २०११-१२ साठी निविदा प्रक्रिया राबवून पुरवठाधारकाची निवड करण्यात आलेली असुन शासनाच्या दिनांक २९/०९/२०११ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार महाराष्ट्र स्टेट को. ऑप. कन्झ्युमरर्स फेडरेशन, मुंबई यांना मुंबई विभागासाठी पुरवठादार म्हणुन नियुक्त केले असल्याचे नमुद आहे. त्याअनुषंगाने शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचा अतिरीक्त कार्यकारी संचालक, महाराष्ट्र स्टेट को. ऑप. कन्झ्युमरर्स फेडरेशन, मुंबई यांच्यासमवेत दिनांक ०१/११/२०११ रोजी झालेल्या वाहतुकीच्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक असुन ते पुरवठादारास मान्य असल्याचे नमुद आहे. सदर करारनाम्यातील अट क्र. ३(ब) नुसार नागरी भागातील शाळांसाठी लागणारा तांदुळ भारतीय अन्न महामंडळाचे गोदामामधुन तांदळाची उचल करुन शाळास्तरापर्यंत किंवा शाळांसाठी शिजवलेल्या अन्नाचा पुरवठा करण्यासाठी नेमलेल्या एजन्सीपर्यंत (केंद्रीय स्वयंपाकगृहापर्यंत) पुरवठा करण्यासाठी संबंधित शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका यांचेमार्फत पुरवठा आदेश देण्यात येतील. अट क्र. ६ नुसार तांदुळ व धान्यादी मालाच्या पुरवठा करणाऱ्या वाहनावर पुरवठादाराने शालेय पोषण आहार योजनेचा बोर्ड लावणे आवश्यक राहील असे स्पष्ट नमुद आहे.

उपरोक्त गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ मधील जप्त तांदळाचा साठा हा शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत वितरीत करावयाचा संपूर्णत: अनुदानित साठा असून सदर साठ्याची

एफ.सी.आय. गोदामातून उचल करुन संबंधित शाळांना अथवा नेमूण दिलेल्या संस्थेच्या केद्रींय स्वंयपाकगृहात पुरवठा करण्याची वाहतूकदार म्हणून मे. महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई या संस्थेची जबाबदारी आहे. तथापी, संदर प्रकरणी सुरेंद्र सुभेदार सिंग हे जप्त ट्रकचे मालक म्हणून सुनावणीस उपस्थित इसमाने ते मे. बी.आर. ट्रान्सपोर्टचे मालक असल्याचे सांगून ते प्राधिकृत वाहतूक ठेकेदार असल्याचे सांगितले. परंतू शासन आदेशान्वये वाहतूक ठेकेदार म्हणून नेमण्यात आलेल्या मे. महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई या संस्थे सोबतचा वाहतूक करारनामा त्यांनी सादर केलेला नाही. तसेच प्राधिकृत वाहतूकदार म्हणून मे. महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि. या संस्थेस सुनावणीस पाचारण करुनही त्यांचे वतीने कोणीही उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे सदर ट्रक मालकासोबत कोणताही वैध करारनामा न करता त्यास शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत वितरणाची जबाबदारी परस्पर सोपविण्यात आल्याचे दिसून येते. ही बाब अत्यंत गंभीर आहे. दिनांक २१/०६/२०१२ रोजी उक्त ट्रकमध्ये गेट पास क्र. १३९३८५, वितरण आदेश क्र. १५३०२ अन्वये २१० बाचके तांदळाचा साठा हा नेमूण दिलेल्या संस्थेस वितरण करण्यासाठी भरला होता. ट्रक चालक गुलाब छोटेलाल यादव याने घटनास्थळी पंचांसमक्ष दिलेल्या कबूली जबाबात, उक्त ट्रकमधील भरण्यात आलेल्या २१० बाचक्यांपैकी १० बाचके त्याने विक्रोळी येथील भवानी महिला मंडळ व ३२ बाचके चेंबूर येथील तनुश्री महिला स्वंयसहाय्यता बचत गट या संस्थेस वितरण केल्याचे सांगून १ बाचका तांदळाचा साठा हा अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानात उतरविला असल्याचे मान्य केले आहे. तथापी, एकूण साठ्यापैकी नमूद दोन्ही संस्थेस वितरीत केलेला एकूण ४२ बाचके साठा वजा जाता १६८ बाचके उक्त ट्रकमध्ये शिल्लक असणे आवश्यक असताना प्रत्यक्षात घटनास्थळी १६४ बाचके ट्रकमध्ये व १ बाचका हा अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानात उतरविला असताना या कार्यालयाच्या फिरत्या पथकाने रंगेहात पकडून एकूण १६५ बाचके तांदळाचा साठा जप्त केल्याचे आढळून येते. म्हणजेच उर्वरीत शिल्लक ३ बाचके तांदळाचा साठा हा घटनास्थळी असलेल्या नमूद रेशन दुकानात अथवा इतर ठिकाणी काळाबाजारीने विक्री केल्याचे सिध्द होत आहे. सबब, नमूद गुन्ह्यातील आरोपीतांनी आपसात संगणमत करुन शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानातुन शालेय विद्यार्थांना मोफत दुपारचे जेवणासाठी वितरीत करावयाचा तांदळाचा साठा हा त्यांनी स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी काळाबाजारीने विक्री करुन उर्वरीत उक्त ट्रकमधील शिल्लक असलेला तांदळाचा साठाही गैरमार्गाने विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगला असल्याचे सिध्द होत आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी दिनांक २९/०६/२०१२ रोजी पारित करण्यात आलेले अंतरीम आदेश कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

0011

तसेच प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ चे मालक तथा प्राधिकृत वाहतूक ठेकेदार तथा बी.आर. ट्रान्सपोर्टचे मालक सुरेंद्र सुभेदार सिंह यांनी सुनावणीच्या वेळी खुलाशात, दिनांक २१/०६/२०१२ रोजी ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ बोरीवली (एफ.सी.आय.) गोदाम येथून शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत २१० बाचका तांदूळ वजन ९९-२५-३५० कि.ग्रॅ. भरुन संबंधित महिला संस्था यांना वितरीत करण्यासाठी निघाला होता. त्यामध्ये भवानी महिला मंडळ विक्रोळी, अक्षदा महिला मंडळ आणि महिला मंडळ गोवंडी यांना महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्झ्यु. फेडरेशन लि. च्या डिलव्हरी चलान नुसार खाली केला होता. परंतू त्याच्या नंतर अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३ ई ५६ मध्ये ट्रक चालक गुलाब यादव याच्या द्वारे एक गोणी (५० कि.ग्रॅ.) विकण्यात आली. त्यांच्या बद्दल ट्रान्सपोर्टरला कोणतीही माहिती नव्हती अथवा ट्रान्सपोर्टरचा कोणताही प्रतिनिधी त्यामध्ये सहभागी नव्हता, असे सांगितले. तथापी, त्यांचे अधिपत्त्याखालील कार्यरत असलेला ट्रक चालक गुलाब छोटेलाल यादव याने घटनास्थळी पंचांसमक्ष दिलेल्या कबूली जबाबात, उक्त ट्रकमधील भरण्यात आलेल्या २१० बाचक्यांपैकी १० बाचके त्याने विक्रोळी येथील भवानी महिला मंडळ व ३२ बाचके चेंबूर येथील तनुश्री महिला स्वंयसहाय्यता बचत गट या संस्थेस वितरण केल्याचे सांगून १ बाचका तांदळाचा साठा हा अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानास गैरमार्गाने विक्री केल्याचे मान्य केले आहे. वास्तविक पहाता ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ चे मालक म्हणून त्यांच्या ट्रक मार्फत उचल करण्यात आलेला तांदळाचा साठा हा नियोजित ठिकाणी पोहचविण्याची जबाबदारी त्यांची असून सदर प्रकरणी मे. बी.आर. ट्रान्सपोर्ट तथा ट्रकचे मालक सुरेंद्र सुभेदार सिंह यांच्या अनुमतीशिवाय त्यांच्या अधिपत्याखालील नमुद ट्रकचा चालक हा संदरचे गैरकृत्य करणार नाही तसेच तपासी पोलिस अधिकारी यांनी सादर केलेल्या अभिवेदनात ट्रकचे मालक सुरेंद्र सुभेदार सिंह हे दोषी आढळून आल्याने त्यांस अटक केल्याचे नमुद केले असल्याने ट्रक मालकाचाही सदर गुन्हयात प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न होत आहे. यावरुन ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ चा मालक व चालक यांनी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानाचे मालक व नोकर यांच्याशी संगणमत करुन सदरचा जप्त शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत असलेला तांदळाचा साठा हा अनुदानीत असल्याचे माहित असून सुध्दा तो गैरमार्गाने विक्री करण्यासाठी ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ चा वापर अवैध वाहतूकीसाठी केल्याचे सिध्द होत आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ हा त्याच्या बाजारमुल्यां एवढी रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार

नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

अ.शि.वा. दुकान क्र.३३/ई/५६ या दुकानाचे भागीदार रामलाल रामभरत रस्तोगी यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, दिनांक २१/०६/२०१२ रोजी त्याच्या नोकराने पंचनाम्यात त्याने केलेल्या बाबीचा त्याला व त्याचे मुळ प्राधिकारपत्रधारक श्री. नरेशकुमार अग्रवाल यांना जराही कल्पना न देता केलेला आहे. उपस्थित अधिकाऱ्यांनी त्याला झालेल्या माहितीबाबत माहिती देऊन दुकानाची संपूर्ण तपासणी घेतली. तपासणीत नोकराने अनधिकृतपणे घेतलेले १ गोणी अर्थात ५० किलो तांदूळ अधिक असल्याचे आढळले. दुकानात उपस्थित नोकराने दुकानाच्या मुळ व भागीदार प्राधिकारपत्रधारक यांना नकळत सर्व गैरव्यवहार केला असल्याचे सांगितले. तसेच सदर दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानाचे मुळ प्राधिकारपत्रधारक नरेशकुमार अग्रवाल यांचे टपालामार्फत प्राप्त निवेदनात, तो ३३ ई ५६ या दुकानाचा मुळ प्राधिकारपत्रधारक असून दिनांक २१/०६/२०१२ रोजी आपल्या कार्यालयातील फिरते पथकातील अधिकाऱ्यांनी त्याच्या दुकानावर पंचनाम्यासह जी कारवाई केली त्याचा दुरध्वनीवरुन त्याचे भागीदार श्री. रामलाल रस्तोगी यांनी त्याला माहिती दिली असल्याचे नमुद करुन त्याच्या गैरहजेरीमध्ये झालेला सर्व कारभार त्याच्या भागीदाराच्या माहितीनुसार त्यांनी नेमलेल्या नोकर म्हणून इसम श्री. संतोष रस्तोगी यांनी केलेला आहे. त्या गैर व्यवहाराबद्दल त्याला व त्याच्या भागीदारास कोणतीही कल्पना नसल्याचे नमुद केले.

तथापी, नमुद गुन्हा नोंद प्रकरणी पथकाने जप्त ट्रकमधील शालेय पोषण आहाराच्या तांदळाच्या साठयापैकी एक बाचका उतरविला असतांना ट्रकचे चालक व दुकान क्र. ३३/ई/५६ चा नोकर म्हणुन उपस्थित इसम नामे संतोष रस्तोगी यास रंगेहाथ पकडले आहे. धाडीच्या वेळी उक्त ट्रकमध्ये १६४ बाचके शिल्लक असल्याचे आढळुन आले. म्हणजेच ट्रकमधील असलेल्या १६५ बाचक्यांपैकी १ बाचका हा नमुद दुकानात उतरविलेले असल्याचे दिसुन येते. सबब, ट्रकमधील उर्वरीत शिल्लक असलेला तांदळाचा साठाही सदर दुकानात गैरमार्गाने विक्री करण्याचा मानस असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. अ.शि.वा. दुकान क्र.३३/ई/५६ चे प्राधिकारपत्रधारक यांना शासनाच्या वतीने त्याच्या दुकानास संलग्न असलेल्या गोरगरीब शिधापत्रिकाधारकांना त्यांचा देय असलेला शासन नियंत्रीत दराचा अन्नधान्य व इतर शिधाजिन्नसांचे वितरण करण्याची जबाबदारी आहे. तथापी, नमुद गुन्हा नोंद प्रकरणी त्यांनी त्यांच्या स्तरावर नेमणुक केलेल्या नोकराने सदरचा साठा हा गैरमार्गाने खरेदी केल्याचे सिध्द होत आहे. वास्तविक पहाता प्राधिकारपत्रधारकाची अथवा त्याच्या समवेत असलेल्या भागीदाराची संपुर्णत:

RATIONING & DIR... HEAD OFFICE MUMBAI

जबाबदारी असतांना त्यांनी या प्रकरणी त्यांच्या अधिपत्याखालील असलेले नोकर संतोष रस्तोगी याचा प्रत्यक्ष सहभाग असल्याचे मान्य करुन त्यांनी त्यांचा या गुन्हयात काहीही संबंध नसल्याचे सांगुन ते या कार्यालयाची तसेच पर्यायाने शासनाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसुन येते. शासनाने प्राधिकारपत्रधारक म्हणून त्यांना नेमुन दिलेली जबाबदारी पार पाडतांना अक्षम्य निष्काळजीपणा दाखविल्याने त्यांनी शासनाची विश्वासार्हता गमावल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये टिळकनगर पोलिस ठाणे, मुंबई येथे स्था.ख.क्र. ५५६/२०१२ दिनांक २२/०६/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) या कार्यालयाचे दिनांक २९/०६/२०१२ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर ट्रकच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा ट्रक लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

Ci0014Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ चे चालक, गुलाब छोटेलाल यादव
२) ट्रक क्र. एमएच-४३-ई-६९५३ चे मालक
३) अ.शि.वा. दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानातील नोकर, संतोष रामभरत रस्तोगी
४) अ.शि.वा. दुकान क्र. ३३/ई/५६ या दुकानाचे प्राधिकारपत्रधारक नरेशकुमार अग्रवाल (भागीदार)
५) अ.शि.वा. दुकान क्र.३३/ई/५६ या दुकानाचे प्राधिकारपत्रधारक रामलाल रामभरत रस्तोगी (भागीदार)
६) महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्ड्युमर्स फेडरेशन लि., मुंबई (पुरवठादार)
७) सुरेंद्र सुभेदार सिंह
८) सुरेंद्र सुभेदार सिंह यांचे मॅनेजर हनुमंत पवार
९) विक्रोळी येथील भवानी महिला मंडळाचे पदाधिकारी
१०) चेंबूर मधील अनिल नामे इसम
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, टिळकनगर पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, टिळकनगर पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा (दुरध्वनी क्र. ०२२-२४१२५४९५) यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र. ५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.
५) कार्यासन अधिकारी, का.क्र. १०, दुकान शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.
६) कार्यासन अधिकारी, का.क्र. २, मागणी शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
(७) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

D:\user E\Amaldata-2012\Ammal Aadesh\Aadesh